Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# नकाशा वाचन कौशल्य वृध्दीसाठी राबविलेल्या उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**संशोधकाचे नाव**
**श्रीम. नम्रता मधुकर जानराव**
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*य.च.म. मु. विदयापीठ*
*अभ्यासकेंद्र - येवला 54499*

**मार्गदर्शकाचे नाव**
**प्रा. ज्योती मोरे**
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*य.च.म. मु. विदयापीठ*
*अभ्यासकेंद्र - येवला 54499*

***सारांश***

*नकाशा हे भौगोलिक माहितीचे प्रभावी माध्यम आहे. नकाशा वाचन कौशल्य म्हणजे नकाशातील विविध चिन्हे, प्रतिके दिशा, प्रमाण व स्थान ओळखून त्याचा योग्य प्रकारे अर्थ लावणे होय. हे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता, निरीक्षण-शक्ती आणि विश्लेषणात्मक दृष्टीकोन विकसित करते. नकाशाच्या माध्यमातून प्रदेशाची स्थिती, अंतर, हवामान, लोकसंत्र्या, नदी नाले, पर्वत इ. माहिती सोप्या पध्दतीने समजते. आधुनिक युगात GPS आणि डिजिटल मॅप्सच्या वापरामुळे हे कौशल्य अधिकच महत्त्वाचे ठरले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नकाशा वाचनाचे मूलभूत कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे.*

*आजच्या युगात आपण क्षणात मोबाईलद्वारे आपल्या दुसर्या देशातील मित्रासोबत संवाद साधतो. (उदा. अमेरिका) पण अमेरिका देश पृथ्वीवर नेमका कोठे आहे याचा आपण विचार करावयाचे ठरवले तर नकाशा वाचन येणे महत्त्वाचे ठरते. नकाशा वाचनाची संकल्पना मानवी जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी भौगोलिक परिस्थितीचा उपयोग करण्यासाठी व ती सुधारण्यासाठी वापरली जाते. नकाशा वाचन आल्याशिवाय भौगोलिक विषयाचे व्यापक स्वरूप लक्षात येत नाही.*

*मुलांना भौगोलिक घडामोडीची कल्पना येण्यासाठी नकाशा वाचन येणे आवश्यक आहे. पानिपत युध्दातील मराठ्यांच्या प्रचंड पराभवाचा किंवा शिवाजीराजांच्या अनेक विजयांचा कारणांचा शोध घेतल्यास अभ्यासातील नकाशाची उपयुक्तता आपल्याला लक्षात येते. केवळ नकाशा वाचन अचूक न करणे अवघड व रूक्ष करता आल्यामुळे मुलांना अभ्यास क वाटतो. असे संशोधकाच्या लक्षात आले. जिल्हा परिषद मराठी शाळेतील उरी च्या मुलांना नकाशा वाचन ह्या विषयी परिसर अभ्यास ह्या पुस्तकात विविध नकाशे दिले आहेत. परंतु मुलांना नकाशा वाचन करतांना अनेक अडचणी येत आहे. असे संशोधकाला लक्षात आले आणि म्हणून संशोधकाने जाणीव पूर्वक विचार करून विद्याथ्यांच्या नकाशा वाचन कौशल्य वृद्धीसाठी उपाय योजना करण्यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य करण्यात आले आहे.*

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**महत्त्वाचे शब्द**

1) नकाशा

2) वाचन कौशल्य

3) वृध्दी

4) उपक्रम

5) परिणाम कारकतेचा अभ्यास

१) नकाशा:-

नकाशा म्हणजे पृथ्वीच्या पृष्ठभागावरील संपूर्ण किंवा विशिष्ट भागाचे प्रतिकात्मक चित्रण होय. तो सपाट पृष्ठावर प्रमाणबध्द प्रमाणात आखलेला असतो. नकाशामध्ये प्रदेशातील भौगोलिक घटक जसे की पर्वत, नदया, सागरे, रस्ते इ. दाखवले जातात.

2) वाचन कौशल्य:-

वाचन ही एक अत्यंत महत्त्वाची बौध्दीक क्रिया आहे. वाचन कौशल्य म्हणजे मजकुरातील अर्थ समजून घेणे, त्याचे विश्लेषण करणे आणि त्यावर चिंतन करणे ही प्रक्रिया होय. कौशल्य विदयाथ्यांना भौगोलिक जाणीव विकसित करण्यास मदत करते. नकाशा वाचता येणं ही अत्यंत उपयुक्त आणि आवश्यक कौशल्य आहे.

3) वृध्दीसाठीः-

वृध्दी या शब्दाचा अर्थ आहे वाढ किंवा उन्नती. एखादया गोष्टीत सुधारणा करणे, ती अधिक चांगली करणे, तिच्या क्षमतेत भर घालणे म्हणजे वृद्धी. वृध्दीसाठी म्हणजे कशात तरी सुधारणा घडवून आणण्यासाठी केलेले उपाय किंवा प्रयत्न

4) उपक्रम:-

उपक्रम म्हणजे एखादया ठराविक उदिदष्टासाठी आयोजित केलेली कृती, कार्यक्रम किंवा योजना.

5) परिणामकारकतेचा अभ्यास

एखादा उपक्रम, योजना किंवा कृती कितपत यशस्वी झाली आहे त्याचे उद्दिष्ट साध्य झाले का याचा विचार पूर्वक अभ्यास करणे यामध्ये त्या उपक्रमाचे फायदे, मर्यादा, अडचणी आणि सुधारणा करण्याच्या संधी यांचा विचार केला जातो.

**संशोधन लेखाचा मुख्यभाग**

**नकाशा वाचन ऐतिहासिक पार्श्वभूमी**

नकाशा वाचनाची परंपरा ही हजारो वर्षापूर्वीपासून अस्तित्वात आहे. मानवाने जेव्हा प्रवास करायला सुरुवात केली तेव्हा मार्ग शोधण्यासाठी आणि विविध भूभागांची माहिती ठेवण्यासाठी नकाशांची गरज भासू लागली. या गरजेतून नकाशांचे आणि त्यान्चे वाचन कौशल्याचे उदय झाले.

प्राचीन काळातील नकाशे -1) मेसोपोटामिया - सुमेरियन संस्कृतीत चिखलावर कोरलेले पहिले ज्ञात नकाशे आढळतात.

2) इजिप्त व चीन - नदवांचे प्रवाह, सेतीसाठी उपयुक्त भूमी आणि शहरांची मांडणी दाखवणारे नकाशे वापरले जात.

मध्ययुगीन काळात -धार्मिक व व्यापाराच्या कारणास्तव नकाशांचा वापर वाढला. अरब देशातील विद्वानांनी खगोलशास्त्र आणि नकाशा शास्त्र यांचा संगम साधला.

आधुनिक काळात म्हणजे 15 व्या 16 व्या शतकात शोधयुग सुरु झाले आणि जगाच्या विविध भागांचा शोध घेतला गेला 19 व्या शतकात त्रिकोणमिती व मोजमापाच्या तंत्रामुळे अचूक भौगोलिक नकाशांची निर्मिती सुरु झाली.

**नकाशा वाचन - आजच्या सद्यस्थितीचा आढावा**

आजच्या डिजिटल युगात नकाशा वाचन कौशल्याला अधिक व्यापक आणि व्यवहार्य रूप प्राप्त झाले आहे. पारंपरिक कागदी नकाशांपासून सुरुवात करून आपण आता डिजिटल, सॅटेलाईट आणि ळच्ॅ आधारित नकाशांपर्यंत पोहचलो आहोत. हे कौशल्य केवळ भौगोलिक शिक्षणापुरते मर्यादित न राहता आजच्या दैनंदिन जीवनात व्यवसाय आपत्ती व्यवस्थापन, संशोधन आणि प्रवास यामध्येही महत्त्वाचे ठरत आहे.

Google Maps, Apple Maps यांसारख्या प्लॅट फॉम्र्समुळे नकाशा वाचन सर्वसामान्यांसाठी सुलभ झाले आहे. स्थान, दिशा वेळ, वाहतुक आणि अंतर याविषयी तात्काळ माहिती मिळते. प्रवास, डिलिव्हरी सेवा, टॅक्सी सेवा (Uber,Ola) या क्षेत्रात नकाशांचा मुख्य वापर होतो.

शिक्षणात नकाशा वाचन फार महत्त्वाचे आहे. आधुनिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना डिजिटल नकाशा, GIS आणि सॅटेलाइट इमेजेसद्वारे भूगोल शिकवला जातो. नकाशा वाचन कौशल्य हे 1 व्या शतकातील मूलभूत शैक्षणिक कौशल्यापैकी एक मानले जाते.

AR/VR तंत्रज्ञानाचा वापर नकाशा वाचनात अधिक दृश्यातक - टाईम बनवत आहे. ड्रोन आणि सॅटेलाईट, इमेजिंगच्या मदतीने अधिक अचूक आणि गतिशील नकाशे तयार होत अहित. शैक्षणिक क्षेत्रात याचे महत्त्व वाढतच चालले असून नकाशा वाचन एक बहु- शाखीय कौशल्य बनत आहे.

**संदर्भ सूची**

1. बापट भा.गो. (1975) शैक्षणिक संशोधन पुणे, नुतन प्रकाशन
2. भिंताडे विश (1994) शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे नूतन प्रकाशन
3. मुळे राश. आणि उमाठे वि तू (1977) शै. संशोधनाची मूलतत्त्वे नागपूर, महाराष्ट्र विदयापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ
4. Maharashtra state Bureau of Textbook production and curriculum Reseach (2020) Geography srd.7 Pune,Balbharti
5) Google Maps (n.d) Retrieved from https://maps.google.com
6) Kulkarni A (2018) प्रभावी नकाशा वाचन कौशल्य एक शिक्षणात्मक विश्लेषण, शैक्षणिक संजीवनी.